# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२१२८**

**अपिलार्थी श्री. दिगंबर कोते**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, ९, हजारीमल सोमानी मार्ग
सी.एस.टी.समोर, मुंबई-४०० ००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक**
महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, ९, हजारीमल सोमानी मार्ग
सी.एस.टी.समोर, मुंबई-४०० ००१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.११.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०६.२०२३ | १४.०७.२०२३ | १२.०८.२०२३ | ०३.१०.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.११.२०२३ रोजीच्या अर्जांन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र  या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर व्दितीय अपील दि. १८.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

२. अपिलार्थी यांनी दि. २३.०६.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"महाराष्ट्र स्टेट ह्युमन राईटस कमिशन, मुंबई येथे दाखल असलेल्या केस क्र. ३२४९/२० चे अंतिम निर्णय प्रतीची छायांकित प्रत मिळावी."*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. १२.०८.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थींनी व्दितीय अपील अर्जात मागणी केल्याप्रमाणे त्यांना सुनावणीची ईमेलव्दारे लिंकही देण्यात आली. परंतु अपिलार्थी ऑनलाईन सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थी यांनी प्रकरण क्र. BDM ३२४९/१३/१/२०२० विषयी माहिती विचारली होती. सदर प्रकरणात दि.०६.०७.२०२३ रोजी अंतीम आदेश पारित करण्यात आले होते. दि. १४.०७.२०२३ रोजी सदर आदेशाची

..२/-

प्रत संलग्न करुन अपिलार्थींना माहिती अर्जाचे उत्तर कळविण्यात आले आहे. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. ०३.१०.२०२३ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे असे नोंदवून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १४.०७.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०३.१०.२०२३ अपिलार्थींना पोस्टाव्दारे पाठविल्याची जावक नोंदवही ज्यामध्ये सदर पत्र निर्गमित करण्यात आले होते, ते आयोगासमोर सादर केले.

४. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०६.११.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai